# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक २६ मे २०११** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**दि.२६ मे २०११**

सचिव विभाग, विधी विभाग, प्रथम संदर्भ रुग्णालय- वाशी आणि विद्युत विभागाचा सन २००९-२०१० च्या लेखा परिक्षण अहवालाबाबत, महापालिका मुख्य लेखा परिक्षकांचे दि.१२/०५/२०११ चे पत्र क्र. नमुंमपा/लेपवि/४७/२०११.

**ठराव क्र.५५.**
**निर्णय:- आयुक्तांकडे अभिप्रायासाठी.**

**विषय क्र.०२**
**दि.२६ मे २०११**

नेरुळ से-१९ येथे आम्रमार्गालगत नवीन आर.सी.सी. गटर बांधण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१३/०५/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./ ११९८/२०११.

ठराव क्र.५६.
**दि.२६ मे २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. श्रीव्यंकटेश्वरा इंफ्रा प्रा.लि. या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८४ टक्के कमी दराने एकूण रु.१,३१,९२,९२४/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढीपोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.०३**
**दि.२६ मे २०११**

ठाणे - बेलापूर रस्त्यावरील दिवाबत्तीची वार्षिक देखभाल दुरुस्ती करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१९/०५/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१२३५/२०११.

ठराव क्र.५७.
**दि.२६ मे २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. नेमस्त इलेक्ट्रीकल्स यांचेशी अंदाजित रक्कम रु.२३,८६,५४९/- पेक्षा ०.०२ टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रु.२३,८६,११९/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४**<br>**दि.२६ मे २०११** | वाशी विभागातील सेक्टर १७, मीनाताई ठाकरे उद्यानाची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.२३/०५/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१२५१/२०११. |
| ठराव क्र.५८.<br>**दि.२६ मे २०११** | "उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.२४,९७,८८८/- (५ टक्के आकस्मिक खर्च, ४ टक्के वास्तुविशारद व १५ टक्के वित्तीय (भाववाढ) खर्चासह ) इतके असून सदर रक्कमेच्या खर्चास व नियमानुसार भाववाढीपोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |

**निर्णयः- मंजूर.**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०५**<br>**दि.२६ मे २०११** | नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.३८, ऐरोली से-१४ येथील शाळेचे वाढीव बांधकाम करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२३/०५/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/अ.श.अ./५३२/२०११. |
| ठराव क्र.५९.<br>**दि.२६ मे २०११** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. श्रीराज एंटरप्रायजेस या कंत्राटदाराबरोबर कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.०० टक्के जास्त दराने (सन २०१०-११ दरसूचीनुसार १६.२४ % जास्त दराने) एकूण रु.६७,५१,८००/- इतक्या खर्चाने करार करण्यास व नियमानुसार भाववाढीपोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी." |

**निर्णयः- संमत.**